# प्रसिध्दी पत्रक

**श्री. नामदेव पुंडलीक वाघमारे, वय ४० वर्षे, पद ग्रामसेवक, टेंभापुरी, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद हे ५,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. नामदेव पुंडलीक वाघमारे, वय ४० वर्षे, पद ग्रामसेवक, टेंभापुरी, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद, रा. बजाजनगर, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक २८/०८/२०१८ रोजी टेंभापुरी फाटा येथे |
| लाचेची रक्कम | :- | ५,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | मालमत्ता रजीस्टरला नोंद घेऊन नमुना नंबर ८ चा उतारा देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे व्यवसायाने शेतकरी असुन, त्यांचे चुलते यांचे नावावरील घर व सहान प्लॉट चे तक्रारदार यांचे वडीलांचे व भावाचे नावावर नोटरी आधारे हंस्तातर करून, मालमत्ता रजीस्टरला नोंद घेऊन नमुना नंबर ८ चा उतारा देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे श्री. नामदेव वाघमारे, ग्रामसेवक टेंभापुरी यांनी ५,०००/- रु लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची ग्रामसेवक श्री. नामदेव वाघमारे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २१/०८/२०१८ रोजी श्री. नामदेव पुंडलीक वाघमारे, वय ४० वर्षे, पद ग्रामसेवक, टेंभापुरी, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद, रा. बजाजनगर, औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रुपयाची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.२८/०८/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. नामदेव पुंडलीक वाघमारे, वय ४० वर्षे, पद ग्रामसेवक, टेंभापुरी, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद, रा. बजाजनगर, औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ५,०००/- रुपये लाचेची रक्कम टेंभापुरी फाटा येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधिक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद

बाळा कुभारे
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.